Satam UDYOG®



# नांव ठेवा मस्त!



# नांव ठेवा मस्त!

नंदकुमार टेणी

सातम उद्योग™
www.satamudyogbooks.com

● ई-बुक आवृत्ती

● संकलन-संस्करण : नंदकुमार टेणी

● फोटोग्राफी : मंदार देवधर

● प्रकाशक : हेमंत स. साटम

● मुद्रक : साटम उद्योग
२०३, अमित इंड. इस्टेट, लालबाग, मुंबई-१२.
८१६९९ ८४९२७

© सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

# नांव ठेवा मस्त :

**आ**ईवडील मुलांना जन्म तर देताच पण त्यासोबत आणखी एक अमूल्य असे लेणं त्यांना देतात, ते म्हणजे त्यांचे नांव ! त्याच्या अस्तित्वाची, कर्तृत्वाची आणि पुढच्या काही पिढ्यांकडून वापरली जाईल, गौरवाने उल्लेखिली जाईल अशी त्यांची आयडेंटिटी ते त्यांना नावाच्या रुपाने देत असतात. आजवर मुलामुलींची नांवे ठेवतांना पूर्वज, कुलदैवते, दैवते, ऋतु, नद्या, फुले, पौराणिक व्यक्तिरेखा यांची नांवे ठेवण्याची परंपरा होती. माता-पित्यांनी ठेवले तेच नांव उत्तम असे पुढची पिढी समजत होती. परंतु आताचा जमानाच वेगळा आहे. नांव म्हणजे केवळ एक संबोधन एवढेच आता समजले जात नाही. तर ज्या मुलाचे, मुलीचे नांव ठेवायचे आहे त्याचे/तिचे भावी व्यक्तिमत्व कसे असेल त्याला/तिला ते अनुरुप असेल की नाही, जे नांव आपण ठेवू ते नवे, आणि त्याचबरोबर त्या मुला-मुलीला अभिमानास्पद वाटेल असे असावे. अशा सगळ्या बाबींचा विचार अत्यंत कटाक्षाने होऊ लागला आहे.

असे असले तरी अनेकदा होते असे की, बाळंतपण झाले की, माता प्रसूतीपर्वातून स्वतःला सावरत असते. तिची शुश्रृषा करण्यात तिच्या सासूबाई, मातोश्री व घरातील अन्य कर्त्या महिला मग्न असतात. घराबाहेरची धावपळ सांभाळण्यात बाळाचे पिताश्री व आजोबा व्यग्र असतात. या सगळ्या धकाधकीत, बाळाच्या कौतुकात दहा-बारा दिवस कसे व कधी निघून जातात ते कुणालाही कळत नाही. आणि एकदम बारशाचा सोहळा तोंडावर येऊन ठेपतो. मग बाळाच्या किंवा बाळीच्या नावांची शोधाशोध सुरु होते. पण सगळे घरच बाळाच्या आगमनाच्या धांदलीत असल्याने चांगली नांवे सुचणे अवघड होते. कधी कधी ज्योतिषी सांगतो की, अमुक अद्याक्षराने सुरु होणारेच नांव ठेवा. कधी फर्मावितो की, अमुक एक अक्षर असणारे नांव अजिबात ठेवू नका. कधी जन्म पत्रिका वेगळाच कौल नावाच्या बाबत देते. या सगळ्या मतामतांच्या गलबल्यात एखादे नांव निश्चित होऊन त्याच नांवाने बाळाचे बारसे होते.

नंतर ही धामधूम संपली की मात्र कुणाच्या तरी बाळाचे/बाळीचे एखादे सुंदरसे नांव कानी येते आणि मग आई-बाबांचा जीव खंतावत म्हणू लागतो, "अरेच्या! हे नांव आपल्या लेकरासाठी किती मस्त होते, अगदी अनुरुप ! पण त्यावेळी आपल्याला ते कसे नाही आठवले ? का नाही ते आपल्याला कुणी सुचविले. तेंव्हा जर ते लक्षात आले असते, कुणी सुचविले, सांगितले असते तर आज किती अभिमानाने त्या नांवाने त्याला/तिला आम्ही हाक मारु शकलो असतो."

असा खंतावण्याचा प्रसंग कुणाी माता-पित्यावर येऊ नये यासाठीच या लेखनाचा हा प्रपंच. मराठी बाराखडीतली जास्तीतजास्त अक्षरांनी सुरु होणारी २४३६ एवढी नांवे यात आहेत. ज्योतिष मानणाऱ्या मंडळींना अमुक एक अक्षर नांवात हवेच असते. त्याच्यासाठी एकाच नावांची बदलती रुपेही या पुस्तकात आहेत. ऋतु, नक्षत्र, श्रृती, स्मृती यांच्या नावासमवेतच उर्दू, फारसी, तुर्की, हिंदी, इंग्रजी या भाषेतील पण अस्सल मराठी बाज ल्यायलेली नांवेही यात आहेत. बाळाच्या आगमनाची चाहूल लागल्यापासून त्याच्या प्रत्येक बाबींचा काळजीपूर्वक विचार करणारे माता-पिता असोत की अगदी बारशाच्या आदल्या दिवशी बाळाचे नांव काय ठेवावे, हा विचार करणारे आई-वडील असोत, या सगळ्यांना अत्यंत उपयुक्त ठरावे असाच हा लेखन प्रपंच आहे.

नांव ठेवण्याचा आणखी एक प्रसंग प्रत्येकावर येतो तो विवाहाच्या वेळी. आपल्या पत्नीचे नवे नांव काय ठेवावे, हा प्रश्न अक्षरशः लाख मोलाचा असतो. आपल्या पतीराजांइतकाच आपल्या नव्या नावाचाही अभिमान वाटेल ज्याची चौरचौघात वाखाणणी होईल असे नांव आपल्या पत्नीचे ठेवता यावे अशी प्रत्येक पतीची इच्छा असते पण त्यावेळीही चांगले नांव सुचत नाही, आठवत नाही अशा पतीराजांसाठीही नावांचा हा खजिना म्हणजे एक आल्हाददायी व अविस्मरणीय भेट ठरेल असा विश्वास वाटतो. तो कितपत सार्थ ठरला याचा कौल मात्र आपण म्हणजेच वाचकांनी द्यावयाचा आहे.

**- नंदकुमार टेणी**